# महर्षि दुर्वासा
# आणि
# श्रीदुर्वासा-आश्रम

## लेखक
## त्रिदण्डीस्वामी श्रीश्रीमद्भक्तिवेदान्त नारायण गोस्वामी महाराज

Published by - Bhakti University, LLC, Harrisburg, PA
with permission from GVP
Financial help from Srimati Chandramukhi Devi Dasi, Hawaii, USA
DTP help from Atul Chandra Goel, Shahdra, Delhi, India, Mob. 9968232341

**प्रकाशक-**

**श्रीमान भक्ति वेदांत दंडी महाराज**
श्री रंगनाथ गौडीय मठ, नृत्य-ग्रामाजवळ,
हेसेरघट्टा, बंगलोर-५६००८८
दूरवाणी: (०८०) २८४६६७६०
मोबाईल: ९९००८८५२४१

**मराठी अनुवाद:**

श्रील गदाधर पण्डित आणि श्रील भक्ति तविनोद ठाकूर यांचा तिरोभाव,
श्री गुण्डिचा मंदिर मार्जन, श्री गौराब्द ५२२
३ जुलाई, २००८



इ-पत्र: bvdandi@gmail.com
vishnudaivata@gmail.com

वेब-साईट: http://www.purebhakti.com
http://www.rangagaudiya.com
http://www.bhaktistudies.com
http://www.purebhakti.tv

## ॐ विष्णुपाद श्री श्रीमद्भक्तिप्रज्ञान केशव गोस्वामी "आचार्य केशरी" यांची उपदेशावली

१ - श्री गुरुपादपद्मांच्या विश्रंभ सेवेद्वाराच भगवद्भक्ति प्राप्त होते.
२ - श्री हरि-गुरु-वैष्णवांची निष्कपट सेवा हीच गुरुसेवा आहे.
३ - कीर्तनीख्या भक्तिच सर्वश्रेष्ठ आणि संपूर्ण भक्ति-अंग आहे.
४ - कीर्तनाच्या माध्यमानेच भक्तिचे इतर अंग पुष्ट होतात.
५ - कुसंगाचा त्यागच निर्जन आहे अर्थात साधु-वैष्णव-संगात भजनच निर्जन भजनाच तात्पर्य आहे.
६ - सदासर्वदा हरिकथेचा प्रचारच हरिकीर्तन आहे.
७ - सदासर्वदा हरिकथा सांगणे अथवा श्रीहरिसेवामय कथेत निमग्न राहणे ही मौनावस्था आहे.
८ - श्रीरूपानुगत्यात गौर-भजन हे श्री राधाकृष्णांचे विप्रलंभ भजन होय.
९ - सद्गुरुचा चरणाश्रय करून हरिसेवा करावी.
१० - तन-मन-वचनाद्वारे कोणाला उद्वेग करू नये.
११ - सत्पथावर राहून अर्थोपार्जनाद्वारा जीवन निर्वाह करावा.
१२ - श्री भगवान एक आहेत, अनेक नाहीत; हे सदैव स्मरण ठेवावे.

।श्रीश्री गुरु गौराङ्गौ जयतः।

# महर्षि दुर्वासा
# आणि
# श्रीदुर्वासा-आश्रम

श्रीगौडीय वेदान्त समिति आणि तदन्तर्गत भारतव्यापी श्रीगौडीय मठांचें प्रतिष्ठाता, श्रीकृष्णचैतन्याम्नाय दशमाधस्तनवर श्रीगौडीयाआचार्य केशरी ॐ विष्णुपाद अष्टोत्तरशतश्री श्री श्रीमद् भक्तिप्रज्ञान केशव गोस्वामीचरणके अनुगृहीत

त्रिदंडिस्वामी श्रीमद्भक्तिवेदान्त नारायण गोस्वामी महाराज द्वारा रचित

## महर्षि दुर्वासा आणि श्रीदुर्वासा-आश्रम

व्रजमण्डलाच्या अंतर्गत प्रमुख बारा वन आहेत. ह्या बारा वनांमध्ये प्रत्येकाच्या अंतर्गत अनेक उपवन आणि त्या उपवनांच्या अंतर्गत अनेक शाखा वन आहेत. या द्वादश वनांमध्ये यमुनेच्या पूर्वीकडे भद्रवन, भांडीरवन, बिल्ववन, महावन आणि लोहवन आहे. पश्चिमेकडे मधुवन, तालवन, कुमुदवन, बहुलावन, काम्यवन, खदीरवन आणि वृंदावन आहे. यापैकी लोहवनाच्या अंतर्गत, यमुनेच्या किनाऱ्यावरमथुरेहून ठीक दोन फर्लांग अंतरावर यमुनेच्या पलीकडे दुर्वासा मुनींचा अत्यंत प्राचीन आश्रम आहे.

महर्षि दुर्वासा सत्य, त्रेता आणि द्वापर - तीनही युगात प्रसिद्ध असे एक सिद्ध योगी आणि महर्षि आहेत. यांच्या मृत्युचा कुठेही उल्लेख नाही. आजपण ते गुप्तवेषात कुठेनाकुठे नक्कीच उपस्थित असतील. ते खूप विचित्र ऋषि आहेत. ते कधी काय करू इच्छितात, हे समजणे खूपच कठीण आहे. त्यामुळे हे सर्व काळ कळण्यास अगम्य आहेत. ते महादेव शंकराच्या अंशाने आविर्भूत झाले. कधीकधी त्यांच्यामधे अकारणच खूप राग जाणवतो. ते सर्व प्रकारचे लौकिक वरदान देण्यास समर्थ आहेत.



## सत्य युगामध्ये महर्षि दुर्वासा

त्यांचा हा आश्रम अर्थात दुर्वासा ऋषि आश्रम पण अत्यंत प्राचीन स्थळ आहे. ही महर्षि दुर्वासांची सिद्ध तपस्या स्थळ आहे आणि हा आश्रम तिन्ही युगांत प्रसिद्ध आहे. भारताच्या समस्त भागातून लोक या आश्रमाच्या दर्शनासाठी आणि आपल्या विविध भौतिक मनोकामनांची पूर्ति करण्यासाठी येतात.

महर्षि अत्रिजी, सृष्टिकर्ता ब्रह्मदेवांचे मानस-पुत्र होते. ते प्रलयकर्ता ब्रह्मा, विष्णू, महेश - हे त्रिदेव (तीन देव) वर देण्यास उपस्थित झाले. या तिघांचे दर्शन करून अत्रिजी कृतकृत्य झाले. ते प्रेमाने गद्गद होऊन त्यांची स्तुति करू लागले. या तीनही देवांनी प्रसन्न होऊन त्यांना वर मागण्यास सांगितले. ऋषिंनी पत्नी अनसुयाशी परामर्ष करून वर मागितला की आपण तीनही देव आमचे पुत्र म्हणून जन्म घ्या. 'असेच होवो' - असे सांगून तिन्ही देव आपापल्या धामात निघून गेले.

थोड्याच दिवसात देवर्षि नारद वीणेवर भगवंताचे गुणगान करत लक्ष्मी, सरस्वती आणि उमाला भेटले. त्यांनीं प्रसंगवशतः अनुसूयेच्या पातिव्रत्य धर्माची खूपच स्तुति केली. त्यांनी सांगितले की या वेळेस अत्रिंची पत्नी अनुसूया विश्वभरात आपल्या पातिव्रत्य धर्मासाठी सर्वात प्रसिद्ध नारी आहे. तिच्यापेक्षा श्रेष्ठ या त्रिलोकात कोणतीही पतिव्रता स्त्री नाही आहे.

देवर्षिंची ही गोष्ट ऐकून त्या तिन्ही देवींचा चेहरा काही उतरला. त्यांना हा अभिमान होता की त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ कोणीही या त्रिलोकात पतिव्रता स्त्री नाही आहे. त्या या गोष्टीला सहन करू शकल्या नाही. त्यांनी आपापल्या पती - श्रीविष्णु, श्री ब्रह्मा आणि श्री महेश यांच्यासमोर आग्रह केला की आपण अनुसूयेच्या पातिव्रत्याची कठीण परीक्षा घ्या, जेणेकरून ती या कठीण परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकणार नाही. परन्तु, तिन्ही देवांनी अनुसूया परम तपस्विनी, पतिव्रता आणि परम भगवद्भक्त आहे म्हणुन खूप समजवले. असे केल्याने घेण्याचे देणे पडू शकेल. तरीपण त्या तीनही देवींनी परत परत आपल्या पतींना तिची परीक्षा घेण्यास आग्रह केला.

आपापल्या पत्नीद्वारे पुन्हा-पुन्हा खूपच आग्रह केल्या गेल्यावर ब्रह्मा, विष्णु आणि महेश - हे तिघेंही श्रीअत्रि आणि अनुसूयेच्या चित्रकुट-स्थित आश्रमांमध्ये आले. त्या वेळी तपस्विनी अनुसूया आश्रमात एकटीच होती. जवळच

एका पर्वताच्या गुहेत अत्रि ऋषि भगवत्-आराधनेत मग्न होते. घनघोर जंगलामध्ये पर्वत श्रेणींमध्ये स्थित अनुसूयेंच्या आश्रमांमध्ये या तिघांनी प्रवेश केला. त्यांना पाहून अनसूया उठून उभी राहिली आणि हात जोडून, त्यांना प्रणाम करून, तिने विचारले की आपण अतिथिंची मी काय सेवा करू? आपण लोक आमचे पूज्य अतिथि आहात. असे म्हणून त्यांच्या सेवेसाठी हातामध्ये पाणी, काही फळ-फूल घेवून त्यांच्यांसमोर उपस्थित झाली. ते तिघेही साधारण अतिथी नव्हते. ते म्हणाले: "जर तु पुर्णतः निर्वस्त्र होऊन आम्हाला भिक्षा देशील तरच आम्ही तुझी भिक्षा स्वीकारु. अन्यथा आम्हीं अतृप्त होऊन निघून जाऊ."

त्यांची अशी ही विचित्र इच्छा ऐकून अनुसूयेने काही विचार केला आणि त्यांना थोड्यावेळ तेथेच प्रतीक्षा करण्यास सांगून ती आपले पति अत्रि-ऋषिंच्या जवळ आली आणि तिन्ही अतिथींची अत्यंत अद्भूत भिक्षा ग्रहण करण्याची गोष्ट सांगितली. अत्रि ऋषिंनीं ध्यान धरले आणि पाहिले की तिन्ही अतिथी इतर कोणी नसून स्वयं ब्रह्मा, विष्णु आणि महेश आहेत. त्यांनी आपल्या पत्नीला निर्देश दिला की हे तीन अतिथी कोणी साधारण अतिथी नाही आहेत, स्वयं ब्रह्मा, विष्णु आणि महेश आहेत. तू त्रिदेवांच्या इच्छेनुसार त्यांचा सत्कार कर, त्यामुळे काहीच हानि होणार नाही. ती तेथून आश्रमात परतली आणि त्रिदेवांना म्हणाली की मी आपण अतिथींच्या इच्छेप्रमाणे सेवा करण्यास सहमत आहे, परंतु आपणपण माझ्या इच्छेनुसार नवजात शिशु बनून माझ्या मांडीवर बसा. लगेचच ते तिघे शिशु होऊन तिच्या मांडीवर खेळू लागले. अनसूया त्या तिन्ही बालकांचे मोठ्या प्रेमाने पालन-पोषण करू लागली. तिने त्या तीन शिशुंचें नामकरण ही केले - चंद्रमा, दत्तात्रेय आणि दुर्वासा. ब्रह्माजी चन्द्राच्या रूपात, विष्णु दत्तात्रेयाच्या रूपात, महेश दुर्वासांच्या रूपात अवतरित झाले.

काही दिवसानंतर लक्ष्मी, सरस्वती आणि उमा - या तिन्ही देवी आपले पति परत न आल्याने फार चिंतित झाल्या. देवर्षि नारदाकडून त्यांना माहित पडले की त्या तिघींचे नवरे लहानलहान बाळे बनून अनुसूयेच्या मांडींवर खेळत आहेत. हे ऐकून त्या तिघीं एकाच वेळेस साधारण वेषात अनुसूयेच्या आश्रमात उपस्थित झाल्या. अनुसूयेने त्यांचा आदर-सत्कार केला आणि नंतर विचारले की आपण कोण आहात? त्यांनी उत्तर दिले की आम्ही तिघीजणी आपल्या सुना आहोत." अनुसूयेने विचारले. "आपण माझ्या सुना कश्या काय झालात?" तर त्यांनी थोडे लाजून उत्तर दिले. "तुमच्या मांडीवर हे तिन्ही बालक दुसरे कोणी



नसून आम्हा तिघींचे पति आहेत. आमचे पति आपले मुलगे आहेत, म्हणून आम्ही आपल्या सुना झालोत." अनुसूयेने त्यांना हसत विचारले की आपण काय इच्छिता? त्यावर त्या म्हणाल्या. "आम्ही तिघीही आपापल्या पतिंना पुन्हा प्राप्त करू इच्छितो. आपण कृपा करून यांना यांच्या पूर्व रूपात आम्हाला वापस करा." हे ऐकून पतिव्रता अनुसूया म्हणाली की वर्तमान स्वरूपात हे माझ्या पुत्रांच्या रूपात माझ्या जवळच राहतील, सोबतच हे आपापल्या मूळरूपात आपल्या तिघींसोबत आपापल्या धामामध्ये पण विराजमान राहतील." ही कथा सत्ययुगाच्या प्रारंभी घडली. पुराणांमध्ये आणि महाभारतात याचे विस्तारपूर्वक वर्णन आहे.

## सत्ययुगामध्ये महर्षि दुर्वासा

दुर्वासा थोडे मोठे झाले. आईवडीलांची आज्ञा घेवून अन्न-पाण्याचा त्याग करून ते कठोर तपस्या करू लागले. विशेषतः यम, नियम, आसन, प्राणायाम, ध्यान, धारणा इत्यादि अष्टांग योगाचे अवलंबन करून ते अश्या सिद्ध अवस्थेला पोहोचले की त्यांना अनेक सिध्दी प्राप्त झाल्या. आता ते सिध्द योगीच्या रूपात विश्वात विख्यात झाले. ते ते जे काही म्हणत, तसेच होत असे. त्यांचे हजारो शिष्य झाले.

तत्पश्चात यमुनेच्या किनाऱ्यावर त्यांनी एक सुंदर आश्रमबनवला आणि तेथेच राहून आवश्यतेनुसार मधेमधे ते इच्छेने सर्वत्र भ्रमणपण करीत असत. मोठ-मोठे ऋषि-महर्षिगण त्यांना भेटावयास येथे येत असत. आश्रमपण यमुनेच्या किनाऱ्यावर सुंदरउपवनात खूपच मनोहर होता, त्यात कोकिळ मधुर गात असे, मयूर नृत्य करत असत, हरिण आणि हरिणी इकडून तिकडे उड्या मारत असत, वेगवेगळे प्राणी स्वच्छंदरूपाने विहार करीत असत. जवळच कमळांच्या पुष्पांनी भरलेली यमुना कलकल ध्वनि करीत प्रवाहित होत होती. अशा प्रकारे त्यांचा आश्रम खूपच सूंदर आणि मनोरम वाटायचा.

दुर्वासा मुनींच्या आश्रमाच्या जवळच पण यमुनेच्या पलिकडे दुसऱ्या किनाऱ्यावर महाराज अंबरीष यांचा एक सुंदर राजवाडा होता. महाराज अंबरीष आपल्या अतिशय दूरच्या राजधानीतून येऊन येथे निवास करून साधन-भजन करीत असत. एका वेळेची गोष्ट आहे. ते निर्जल उपवास करीत होते आणि रात्रभर

जागरण करून द्वादशी-व्रत पालन करीत होते. दुसऱ्या दिवशीप्रातःकाळी आपली नित्य क्रिया, स्नान, आह्निक, तथा अर्चन-पूजा संपवून उपस्थित वैष्णव, ब्राह्मण आणि अतिथिंचा सत्कार करून आणि त्यांना भगवत्-प्रसादाद्वारे प्रसन्न करून स्वतः महाद्वादशीचे पारण करू ईच्छित होते. सुर्योदयानंतर दोन घडीच्या आतच पारणाचा समय होता. वेळ फारच कमी होता, येवढ्यात महर्षि दुर्वासा तेथे येऊन पोहोचले. त्यांना पाहून महाराज अंबरीषांना फार आनन्द झाला. ते म्हणाले. "हे महर्षि! आज आमचे परम सौभाग्य आहे की आपल्या सारख्या अतिथीची सेवा करण्याचा सुयोग प्राप्त झाला आहे. देवाचा महाप्रसाद आपल्या समोर प्रस्तुत आहे, कृपया आपण स्वीकारा." दुर्वासा फार विचित्र ऋषि होते, त्यांचा स्वभाव निराळा होता. ते कधी काय करतील, हे समजणे फारच कठीण होते. त्यांनी सांगितले की मी अजून स्नान आणि इतर नित्य-क्रिया समाप्त केल्या नाहीत. मी यमुनेत स्नान इत्यादि करून लगेचच वापस येतो. असे म्हणून लगेचच ते यमुनेच्या तटाकडे गेले.

पारणाचा समय निघून जात होता. ऋषिंनी यायला वेळ लावला, अजूनपण आले नाहीत. महाराज अंबरीष उभय संकटात पडले. जर निमंत्रित अतिथीचा सत्कार न करता पारण केले तर ब्राम्हण अतिथिची अवज्ञा होईल आणि ऋषि असंतुष्ट होऊन शाप देऊ शकतील. अशाप्रकारे लौकिक सदाचाराचे उल्लंघन होईल. परंतु, दुसरीकडे द्वादशीला उचित वेळेवर पारण न केल्याने पारमार्थिक भक्तिची हानी होईल. त्यांनी धर्मज्ञ ब्राह्मणांचा परामर्ष घेऊन निर्दीष्ट वेळेच्या आतच एक थेंब श्रीचरणामृत घेतले, कारण जे लोक व्रताच्या दिवशी निर्जल उपवास करतात, त्यांच्याकरिता दुसऱ्यादिवशी चरणामृत इत्यादि जल घेवून उपवास सोडण्याबद्दलचा नियम शास्त्रात सांगितला आहे. पण जे लोक व्रताच्या दिवशी अनुकल्प म्हणून फळ वगैरे ग्रहण करतात, त्यांच्यासाठी भगवंतांचा अन्न-प्रसाद घेवून पारण करण्याची शास्त्रात विधी आहे. कोणत्याही प्रकारे पारमार्थिक भक्तिचा अनादर होवू नये, अन्यथा भक्ति नष्ट होते. अशाप्रकारे अंबरीष महाराजांनी परमार्थाची महत्ता श्रेष्ठ समजून चरणामृतानेच पारण केले. या प्रकारे त्यांचे द्वादशी व्रताचे पारण झाले आणि नाहीपण झाले. लौकिक धर्माला सोडून पारमार्थिक धर्माचे रक्षण करणेच उचित आहे.

ते पारण करणारच होते, एवढ्यात ऋषि तेथे उपस्थित झाले. त्यांनी योगबळाने हे ओळखले की अंबरीष महाराजांनी द्वादशीचे पारण केले आहे. ते



रागाने थरथर कापू लागले. ते म्हणाले कि तु खूप पाखण्डी आहेस, तु मला निमंत्रण देवून भोजनाला बोलवलेस आणि मला खायला द्यायच्या आधीच स्वतःच भोजन केलेस. मी तुला आताच याचा दंड देतो. असे म्हणून त्यांनी आपल्या जटेच्या काही अंश उपटून जमिनीवर आदळला. त्या जटेतून एक जळत असलेली कृत्या राक्षसी प्रकट झाली आणि महाराज अंबरीषांना जाळण्यासाठी अतिशय वेगाने अग्रसर झाली. महाराज अंबरीष हात जोडून उभे होते, परंतु ते संपूर्णपणे निर्भिक होते, कारण ते अनन्यरूपाने भगवंतांना शरणागत होते. ठीक याच वेळी शरणागत वत्सल भगवंताचे महाबलशाली सुदर्शन चक्र भक्ताच्या रक्षणाकरिता क्षणभरात प्रकट झाले. त्याने कृत्या राक्षसीला जाळून भस्म केले आणि नंतर ते दुर्वासा मूनिकडे अग्रसर झाले. दुर्वासा मुनी खूपच भयभीत झाले, ते आपल्या प्राणांची रक्षा करण्याकरिता खूप वेगाने पळत होते. ते तिथून् पाताळ आणि स्वर्ग आदि सर्व चौदा लोकांना पार करून शिवलोकात पोहोचले आणि शंकरापाशी आपली सुदर्शन चक्रांपासून रक्षा करण्यासाठी विनवणी करू लागले. सुदर्शन चक्र वेगाने त्यांचा पाठलाग करत होते. त्यांना पहाताच, शंकर त्यांना म्हणाले, तुम्ही खूपच विचित्र आहात. भगवंतांच्या भक्तांसोबत पण भांडण घेता, तुम्ही त्यांचा महिमा जाणत नाही. भगवद्भक्तांच्या चरणी अपराध करणाऱ्यालामी कोणतेही सहाय्य करू शकत नाही. तुम्ही सरळ भगवान विष्णूकडे जा. ज्यांचे हे चक्र आहे, तेच तुमची रक्षा करू शकतील, इतर कोणी नाही.

ते आल्या पावली विष्णुलोकांत भगवान विष्णुंच्या श्रीचरणांपाशी उपस्थित झाले आणि आपल्या प्राणांचे रक्षण करण्याची प्रार्थना करू लागले - "प्रभु! माझी रक्षा करा, मी खूपच आर्त आहे. आपल्या अतिरिक्त कोणीही या जगात माझी रक्षा करू शकणार नाही. म्हणून मी आपल्याला शरण आलो आहे. आपण शरणागतवत्सल आहात, म्हणून शरणागतांची रक्षा करणे हाच आपला स्वभाव आहे." भगवान विष्णु म्हणाले. "मी भक्त-विद्वेषींची रक्षा करू शकत नाही. मी भक्तांचे हृदय आहे आणि भक्त माझे हृदय आहेत. मी भक्तांना कधीच सोडू शकत नाही, मी त्यांच्या अधीन आहे. माझ्या ज्या भक्ताच्या चरणी आपण अपराध केला आहात, तो भक्तच आपल्याला क्षमा करू शकतो, मी करू शकत नाही. जर आपण आपले कल्याण इच्छिता, तर भक्त अंबरीषपाशीच क्षमा याचना करावी."

असे ऐकून दुर्वासा मुनी खूप निराश झाले. दुसरा कोणताही उपाय न पाहून, त्यांनी अंबरीष महारांजांकडे जाण्याचाच निश्चय केला. जसे ते अंबरीष महारांजकडे आले, अंबरीष महारांजांनी त्यांना मोठ्या नम्रतेने हात जोडून नमस्कार केला. पण दुर्वासा मुनींनी त्यांच्या चरणावर लोटांगण घातले आणि आपल्या केलेल्या कुकृत्याबद्दल त्यांच्यापाशी क्षमा प्रार्थना मागत आपल्या प्राणांची रक्षाची प्रार्थना करू लागले. महाराज अंबरीषांनी सुदर्शन चक्राची स्तुति करून त्याला शांत केले. दुर्वासा मुनी भक्तिची अशी महिमा पाहून स्तब्ध झाले आणि म्हणांले, "धन्य आहे! आज मी भगवान अनंतदेवांच्या भक्तांचे महत्व पाहिले; राजन! मी आपल्या प्रति अपराध केला, तरीसुद्धा आपण माझ्याबद्दल मंगल कामनाच करीत आहात. ज्यांनी भक्तवत्सल श्रीहरिची चरणकमळे दृढ प्रेमाने धरले आहेत, त्या साधुपुरुषांना कोणते कार्य अशक्य आहे? ज्यांचे हृदय उदार आहे, असे महात्मा भले कोणत्या वस्तुचा त्याग करू शकणार नाही, ज्यांच्यां मंगलमय वाणीच्या श्रवणानेच जीवांचे हृदय मंगळ होते. अशा तीर्थपाद श्रीभगवंतांच्या दासांचे कोणते कर्त्यव्य अपूर्ण राहाते? अर्थात काहीही अपुर्ण राहात नाही. अहो! आपण माझ्यावरती महान अनुग्रह केला आहे. आपण माझ्या अपराधांना विसरून करून माझ्यां प्राणांची रक्षा केली आहे."

जेंव्हापासून दुर्वासा मुनी आपल्या प्राणांची रक्षा करण्याकरता इकडे तिकडे पळत होते, तेंव्हापासून आजपर्यंत महाराज अंबरीषांनी भोजन केले नव्हते. त्यांच्यां येण्याची ते वाट पहात होते. त्यांनी दुर्वासा मुनींचे चरण पकडले आणि खूप प्रेमाने जेवू घातले. दुर्वासा मुनी जेवण करून तृप्त झाले आणि मोठ्या आदराने त्यांना म्हणाले, "राजन! तुम्हींपण जेवण करून घ्या."

दुर्वासा मुनींनी सन्तुष्ट होऊन अंबरीष महाराजांच्या गुणांची स्तुति केली आणि आपल्या आश्रमाकडे परतले. अंबरीष महारांजांच्या सहवासाने दुर्वासा महर्षिंचे जीवन चरित्र बदलले (पालटले). आता ते ब्रम्हज्ञान, अष्टांगयोग इत्यादी पेक्षा शुद्ध भक्तिच्या महिमेची अधिकता समजून भक्तिमार्गाकळे वळले.

## त्रेतायूगामध्ये महर्षि दुर्वासा

उक्त घटनेनंतर दुर्वासा मुनी वृन्दावनात असलेल्या त्यांच्या या आश्रमामध्ये अधिक निवास करू लागले. तेथून ते आवश्यकतेनूसार विश्व तथा



अन्य लोकात भ्रमण करू लागले. त्रेतायुगामध्ये पण महर्षि दुर्वासांच्या अनेक कथांचा उल्लेख विविध पुराणांमध्ये आणि महाभारतात आहे.

श्रीरामचंद्रानी या धरतीवर अवतीर्ण होऊन अकरा हजार वर्ष पर्यंत लीला केल्या. शेवटी ब्रह्माजींच्या इच्छेनूसार कालपुरुष एका महर्षींचे रूप घेवून श्रीरामचंद्रांजवळ आले. त्याने श्रीरामचंद्रांबरोबर एकांत स्थानात काही संभाषण करण्याची इच्छा प्रकट केली, जेणेकरून कोणतीही व्यक्ति त्याला ऐकू शकणार नाही. भगवान श्रीरामचंद्रांनी लक्ष्मणाकडे वळून त्याला सांगितले - "लक्ष्मणा! तु स्वयं राजभवनाच्या द्वारात उभा रहा आणि कोणालाही आत येवू देऊ नकोस. जर कोणी व्यक्ति आम्हा दोघांच्या वार्तालापाच्या उपस्थित झाला, तर त्याला मी मृत्युदंड देईन." लक्ष्मण राजभवनाच्या द्वारात उभे राहीले. इकडे कालपुरुष आणि श्रीरामचंद्रांमध्ये वार्तालाप होऊ लागला. कालपुरुषाने श्रीब्रह्मांजींचा संदेश ऐकवला की आता आपल्या लीलेची वेळ संपली आहे, म्हणून आपल्याला आपल्या लीलेचे संगोपन करून नित्य-धामात प्रवेश करावयास हवा. वार्तालाप होतच होता, तेवढ्यात दुर्वासा महर्षि राजभवनाच्या द्वारात आले आणि लक्ष्मणाला म्हणाले की मी अत्यावश्यक कार्यासाठी आताच श्रीरामचंद्राना भेटू इच्छितो. श्रीलक्ष्मण म्हणाले - महात्मा! आपण आपले कार्य सांगा, मी त्याला शीघ्र पूर्ण करेन." पण क्रोधी स्वभावाच्या दुर्वासा मुनींनी ऐकले नाही. ते म्हणाले - "मला आताच श्री रामचद्रांना भेटायचे आहे आणि तु जर मला त्याना भेटू दिले नाही, तर मी राजा रामचंद्र आणि सर्व प्रजेला शाप देवून भस्म करेन." लक्ष्मणानी मनात विचार केला की संपुर्ण प्रजेसोबत श्रीरामचंद्र आणि स्वत:ला भस्म करण्यापेक्षा जर मी माझ्या एकट्याचे भस्म होणेच उचित. असा विचार करून ते एकटे श्रीरामचंद्रांकडे आले.

तो पर्यंत कालपुरुषाबरोबर श्रीरामचंद्रांचा वार्तालाप समाप्त झाला होता. परंतु कालपुरुष अजूनही उपस्थित होता. श्रीरामचंद्रांनी विचारले - "लक्ष्मण! तू अयोग्य वेळी का आलास?" श्रीलक्ष्मण म्हणाले - "प्रभो! द्वारात दुर्वास महर्षि आलेले आहेत. ते आताच्या आता फक्त आपल्याला भेटू इच्छितात. विलंब झाल्यास सा~ याप्रजेसोबत आपल्याला आणि मलापण शापाने भस्म करण्यास तयार आहे." श्रीरामचंद्रांनी कालपुरुषाला निरोप दिला आणि खूप उदास होवून गंभीर स्वरात लक्ष्मणाला म्हणाले - "काय तुला माझ्या प्रतिज्ञेचे स्मरण आहे? मी वार्तालापाच्या मध्ये अयोग्य वेळी आलेल्या कोणत्याही व्यक्तिला मी प्राणदंड

देण्याची प्रतिज्ञा केली आहे. प्रिय व्यक्तिचा त्याग करणेच सत्पुरुषांनां प्राणदण्ड शिक्षा देण्यासारखे आहे. म्हणून जीवनभरासाठी मी तुझा त्याग करतो."

लक्ष्मण श्रीरामचंद्रांच्या श्रीचरणीं प्रणाम करून राजभवनातून निघून सरळ सरयु नदीच्या तटावर आले. ते सरयु नदीमध्ये स्नान करून आपल्या मनाला एकाग्र करून ध्यानस्थ झाले आणि आपल्या धामाला निघून गेले.

इकडे रामचंद्रांनी दुर्वासा मुनींना बोलवले. दुर्वासा आल्यावर खूपच आदर-सत्कार करून विचारले - "महर्षि! मी आपली काय सेवा करू शकतो?" दुर्वासा मुनी म्हणाले, "मला खूप भुक लागली आहे. आपल्या घरात जी काही सामग्री आहे, ती मला त्वरित खायला द्या." श्रीरामचंद्रांनी जी काही खाद्यसामग्री उपलब्ध होती, ती सर्व आणून मुनींच्या समोर ठेवली. ऋषिंनी ती सर्व सुस्वादु खाद्यसामग्री पोट भरून खाल्ली आणि संतुष्ट होवून तेथून निघून गेले.

रामचंद्र लक्ष्मणांच्या वियोगात खूप दुःखी झाले. त्यांनी लक्ष्मणांचा स्वधाम जाण्याचा वृत्तांत ऐकून स्वतः ही स्वधामाला जाण्याचा विचार केला. आपल्या दोन्ही पुत्रांचां - लव-कुश आणि आपल्या भावांच्या पुत्रांचा पृथक-पृथक राज्याभिषेक करून, ते अयोध्येच्या सर्व प्रजेला बरोबर घेऊन सरयु नदीच्या पवित्र तटावर उपस्थित झाले. तेथे त्यांनीं सर्वांसोबत अंघोळ केली. येवढ्यात आकाशातून सूर्यासमान चमकणारे लाखो विमाने तिथे उपस्थित झाली. श्रीरामचंद्र उपस्थित जनसमूहासोबत त्या विमानांवर चढून स्वधामाला गेले.

लक्ष्मणाचा त्याग एक निमित्त मात्र होते. श्रीरामचंद्र लक्ष्मणांचा त्याग कधीच करू शकत नाहीत, कारण श्रीलक्ष्मण स्वयं धामस्वरूप आहे. ते श्रीकृष्णाच्या प्रत्येक अवतारात त्यांच्या बरोबरच राहातात आणि त्यांच्या सर्व प्रकारच्या लीलेत सहायक होतात. अशा प्रकारे लक्ष्मण नित्य साकेतत धामात श्रीरामांच्या पूर्वीच उपस्थित होवून त्यांची वाट पहात होते. श्रीरामचंद्रांचे स्वधामात आगमन होताच त्यांनी त्यांचे स्वागत केले.

* * *

प्राचीन काळी इन्द्राच्या समान बलवान आणि पराक्रमयुक्त श्वेतकि नावाचा एक राजा होता. त्यावेळी त्यांच्यासारखा यज्ञ करणारा, दाता आणि बुद्धिमान दुसरा कोणी नव्हता. त्यांनी मोठ-मोठे यज्ञ आणि अनुष्ठान केले होते. यज्ञ आणि दान सोडून त्यांच्या मनामध्ये दुसरा कोणताही विचार येत नसे. ते नव-नवीन यज्ञांच्या अनुष्ठान आणि नाना प्रकाराच्या दानकार्यांमध्ये लागलेले होते.



यज्ञ करता-करता ऋत्विजांचे डोळे धूराने दुखु लागले, आहुति देता-देता ते थकले. त्यांची अनुमति घेवून राजाने नवीन-नवीन ऋत्विजांना नियुक्त केले, पण ते सुद्धा थकले. राजाच्या द्वारे शोधून सुद्धा यज्ञ करणारे ऋत्विज भेटीनासे झाले. शेवटी ते ऋत्विजांना शरण गेले. त्यांनी परामर्ष दिला कि आपण महादेव श्रीरुद्राजवळ जा, तेच याची काही व्यवस्था करू शकतील." महाराज श्वेतकी कैलास पर्वतावर जाऊन श्रीरुद्रदेवाला प्रसन्न करण्यासाठी काहीही न खातापिता उग्र तपस्या करू लागले. त्यांची घोर तपस्या पाहून श्रीशंकरांने त्यांना दर्शन दिले आणि वर मागण्यास सांगितले. महाराज श्वेतकीने अमित तेजस्वी श्रीरुद्रांच्या चरणी नतमस्तक होवून म्हणाले - "देव देवेश! सुरेश्वर! मी एक शत वर्षीय मोठे यज्ञ करू इच्छितो, जर तुम्ही माझ्यावर प्रसन्न असाल, तर आपण स्वयं येवून माझा यज्ञ संपन्न करा." शंकर हसून म्हणाले - "यज्ञ करणे हे आमचे काम नाही. मी स्वतः तुमचा यज्ञ करणार नाही, परंतु माझाच अंश असलेला एक महाभाग श्रेष्ठ द्विज आहे, ते दुर्वासा नावाने विख्यात आहे, तेच तुमचा यज्ञ करतील. रुद्रदेवांनी महर्षि दुर्वासा मुनींना बोलवून राजा श्वेतकिचा यज्ञ पूर्ण करण्याची आज्ञा दिली. महर्षि दुर्वासांनी रुद्रदेवांची आज्ञा शिरोधार्य मानून विधिविधानपूर्वक राजाचा यज्ञ केला. महाराज श्वेतकिची इच्छा पूर्ण झाली आणि त्यांनी ऋत्विजांना प्रचुर धन दक्षिणा देवून संतुष्ट केले.

* * *

महर्षि दुर्वासा खूपच तेजस्वी होते. त्यांची सर्वत्रच मोठी ख्याती पसरली. एकेवेळी महाराज उर्व आपली विवाह-योग्य कन्या कंदलीसाठी योग्य वर शोधत होते. कंदली खूपच रूप आणि यौवन- संपन्ना किशोरी होती, पण फारच कटुभाषी आणि भांडखोर होती आणि छोट्या-छोट्या गोष्टींवरून राग करायची. तिचे वडील तिचा विवाह योग्य वर बघून करू इच्छित होते. ते आपल्या कन्येला घेवून दुर्वासा महर्षिंच्या आश्रमात आले. त्यांनी मोठ्या नम्रपूर्वक दुर्वासा मुनींना प्रणाम केला आणि आपल्या कन्येला पत्नी म्हणून स्वीकार स्वीकारण्याची विनंती केली. ऋषिंनी रूप-यौवनाने संपन्न कंदलीला पाहून आपली संमति दिली. जेंव्हा विवाह होण्याचा समय आला, तेंव्हा महाराजांनी महर्षिंपुढे ही प्रार्थना केली कि आपण कृपा करून हिचे अपराध क्षमा करून. शेवटी हिचे शंभर अपराध अवश्य क्षमा करावे. दुर्वासा मुनीने हे स्वीकार केले. विवाह केल्यावर कंदली दुर्वासा आश्रमामध्ये आली. येथे आल्यावर दुर्वासांना हे माहित पडले कि ही कलहप्रिय

आहे, बोलण्या-बोलण्यामध्ये अपमानजनक शब्द वापरते. खुपच सांगितल्यानंतर सुद्धा तिचा स्वभाव सुधरत नाही. थोड्याच दिवसात तिने शंभरहून अधिक अपराध दुर्वासा ऋषिंच्या प्रति केले, तेव्हां महर्षिंना राहवले नाही आणि त्यांनी शाप देऊन तिला भस्म केले.

थोडे दिवस झाल्यानंतर ते काही दिवसांकरिता द्वारकेमध्ये निवास करत होते. तेथे यदुवंशांमध्ये उत्पन्न एक रूप-यौवन-संपन्ना एकानंशा नावाची कन्या होती. या कन्येचा विवाह यादवांनी महर्षि दुर्वासांशी करवून दिला. परंतु, थोड्याच दिवसात दुर्वासा महर्षिंनी त्यातून विरक्त होवून उक्त एकानंशाचा पण त्याग करून टाकला आणि पुनः आपल्या आश्रमात परतले.

* * *

कुरुक्षेत्रामध्ये मुद्गल नावाचे एक ऋषि होते. ते फारच धर्मात्मा आणि जितेंद्रिय होते. शेतामधील धान्य कापल्यानंतर जे अन्नाचे दाणे शेतात पडायचे, त्यांना एकत्रित करून (शिल आणि उंच्छवृत्तिने) आपली जीविका चालवत असत. ते सदा सत्य बोलायचे आणि कोणाचीही निंदा करीत नसत. त्यांनी अतिथिंच्या सेवेचे व्रत घेतले होते. ते आपल्या स्त्री आणि पुत्राबरोबर पंधरादिवसापर्यंत काही अन्न संग्रह करीत आणि त्याच्याद्वारे इष्टीकृत नामक यज्ञाचे अनुष्ठान करीत असत आणि तत्पश्चात अतिथिंची सेवा करून राहिलेल्या अन्नाने पंधरा दिवसात एकदाच भोजन करीत असत. जो पर्यन्त ते जेवण करीत नसत, तो पर्यंत शेकडो अतिथिंनी भोजन केल्यानंतर सुद्धा अन्न संपत नसे.

एकदा दुर्वासा ऋषि वेड्याप्रमाणे विचित्र वेष धारण करून विवस्त्र होऊन नाना प्रकारचे कटुवचन बोलत मुद्गल ऋषिंच्या आश्रमात आले आणि म्हणाले - "विप्रवर! मला खूप भुक लागली आहे, मी जेवण करू इच्छितो." मुद्गलने सांगितले - "आपले स्वागत आहे." असे बोलून त्यांनी पाद्य, अर्घ्य आणि आचमनीय आदि पूजन-सामग्री भेट केली आणि त्यांना भोजन अर्पण केले. दुर्वासा मुनींनी सर्व भोजन संपवले आणि राहिलेले उष्टे शरीरावर आपल्या साऱ्या शरीरावर लेपून घेतले आणि ज्याप्रकारे ते आले होते त्याच प्रकारे निघूनही गेले. मुद्गल मुनी आणि त्यांचा परिवार उपाशी राहिला.

पंधरा दिवसानंतर पुन्हा दुसरा पर्वकाळ आल्यावर दुर्वासामुनी परत तेथे पोहोचले आणि त्यांनी सर्व भोजन भक्षण करून टाकले. मुद्गल मुनी परत पुढच्या



पर्वकाळाची तयारी करू लागले. पंधरा दिवसानंतर ठीक वेळेवर परत दुर्वासा मुनी तेथे पोहोचले आणि सारेचे सारे अन्न खाल्ले. अशा प्रकारे लगातार सहा वेळा ठीक पर्वाच्या समयी उपस्थित होवून सारे अन्न खावून टाकले. लागोपाठ इतके दिवस उपाशी राहून सुद्धा मुनींच्या मनात कोणताही विकार आला नाही. त्यांच्या हृदयामध्ये क्रोध, द्वेष, भीती आणि अपमानाचा स्पर्शपण झाला नाही. असे पाहून दुर्वासा महर्षि अत्यंत प्रसन्न होवून म्हणाले - "ब्रह्मन! या संसारात इर्षा, द्वेष आणि अपमानरहिरत होऊन दान देणारा तुझ्यासारखा मनुष्य आणि दुसरा कोणीही नाही. अन्नानेच प्राणांचे रक्षण होते. भूक असल्याने मन चंचल होते, त्या वेळी मनाला थांबवणे खूपच कठीण आहे, पण तुम्ही सिद्ध झाला आहात. तुम्ही आपल्या कठोर तपस्येमूळे सर्व लोकांवर विजय प्राप्त केला आहे, म्हणून तुम्हाला स्वर्गालोकाची प्राप्ति होवो." असे म्हणताच स्वर्गातून एक विमान खाली आले, परंतु स्वर्गलोकांच्या गूण आणि दोषांना नश्वर समजून मुद्गल मुनींनी त्या विमानाला परत पाठवून दिले.

## द्वापरमध्ये महर्षि दुर्वासा

यदुवंशी महाराज शुरसेनचे पुत्र वसुदेव होते. त्यांना एक कन्या पण होती, जिचे नाव पृथा होते. भूमण्डालामध्ये तिच्या रूपाच्या तुलनेत अधिक सूंदर दुसरी कोणी स्त्री नव्हती. शूरसेनांनी आपल्या संतानहीन आत्येभाऊ कुन्तिभोजाला ती कन्या आपल्या पूर्व प्रतिज्ञेनुसार दिली . तेव्हांपासून तिचे एक नाव कुंतींपण झाले. त्यांनी कुन्तीला दत्तक घेतले. पिता कुंतिभोजाने पृथेवर घरी देवतांचे पूजन आणि अतिथिंच्या सत्काराचा कार्यभार सोपवला. एकदा कठोर व्रताचे पालन करणारे आणि धर्माच्या विषयात आपल्या निश्चयाला सदा गुप्त ठेवणारे दुर्वासा राजा कुंतिभोजाच्या राजभवनामध्ये आले. पृथा खूप सावधानीने त्यांची सेवा करू लागली. ऋषि खूप उग्र स्वभावाचे होते. त्यांचे हृदय फार कठोर होते, पण तरीसुद्धा राजकुमारी पृथाने सर्व प्रकारच्या प्रयत्नांनी त्यांना पूर्ण संतुष्ट केले. दुर्वासा मुनींनी पृथावर येण्याऱ्याभावी संकटांचा विचार करून तिच्या धर्माच्या रक्षणार्थ अथर्ववेदीय प्रसिद्ध वशीकरण मंत्र प्रदान केला आणि त्याच्या प्रयोगाची विधिपण सांगितली. त्यानंतर ते मुनी म्हणाले, "या मंत्राद्वारे तु ज्या देवतेला आवाहन करशील, त्यांच्यां कृपेने तुला पुत्र प्राप्ति होइल." ब्रह्मर्षि दुर्वासाचे असे

वक्तव्य ऐकून कुंतीच्या मनामध्ये मोठे कुतुहल उत्पन्न झाले. ती राजकन्या सध्या कुमारी अवस्थेत होती, परंतु तिने मंत्रांच्या परीक्षेसाठी सूर्यदेवाला आवाहन केले. आवाहन करताच तिने पाहिले की सूर्यदेव तिच्या पुढे येवून उभे राहिले. ही महान आश्चर्याची गोष्ट पाहून निर्दोष शरीराची कुंती चकित झाली. सूर्यदेवांने विचारले. "सुंदर कुंती! मी तुझे काय प्रिय कार्य करू? मी तुम्हाला पुत्र देण्याकरता येथे उपस्थित झालो आहे, तुम्ही मला सूर्यदेव समजा." कुंती लोकलज्जेच्या भयाने लाजली. ती स्त्री-सुलभ लज्जेमूळे विवश झाली. सूर्यदेवाने पुन्हा कुंतीला सांगितले, "राजकुमारी! तुला फारच मोठा शुरवीर, महादानी, स्वाभिमानी, दिव्य-कुण्डल आणि कवच धारण करणारा एक सूंदर पुत्र होईल, येवढेच नाहीतर तुझे कौमार्य पण अतुट राहील." असे म्हंटल्यावर कुंतीला एक पुत्र उत्पन्न झाला. भविष्यात तोच पुत्र महावीर कर्णाच्या रूपात प्रसिद्ध झाला. नंतर असेच आवाहन केल्यावर धर्मराज, पवनदेव तथा देवराज इंद्राद्वारे पण क्रमशः युधिष्ठिर, भीम तथा अर्जुन सारखे सुपुत्र प्राप्त झाले. हे दुर्वासा महर्षिंच्याच कृपेचे फळ होते.

* * *

स्वयं भगवान श्रीकृष्णांचा आविर्भाव झाला होता. आता ते थोडे मोठे झाले होते. दाम, श्रीदाम, सुदाम, वसुदाम, स्तोककृष्ण, उज्वल, लवंग, सुबल, मधुमंगल इत्यादि मित्रांसोबत गोकुळमधील रमणरेतीवर खेळावयास लागले होते. कधी एक दुसर् यावरधूळ फेकत असत, तर कधी लपाछपी खेळत असत आणि कधी एक दूसर् याशीकुस्तीत भिडून एक दूसर् याला पराजित करण्याचीचेष्टा करत असत. पराजित होणारा आपल्या खांद्यांवर पराजित करणार् यालाबसवून काही अंतरावर घेवून जात होता. एवढ्यातच दुर्वासा मुनी फिरत-फिरत तिकडे आले. गोपबालकांच्या मनोहर क्रीडेला पाहून, विशेषतः कृष्ण आणि बलरामांचे अनुपम सौंदर्य व माधुर्य पाहून ते एकटक त्यांच्याकडे बघू लागले. त्यांना आपल्याकडे एकटक पाहाताना बघून श्रीकृष्णाने श्रीदामाचा हात पकडला आणि ऋषिंच्या जवळ गेले. हे दोन बालक धूळीने माखलेले होते. दुर्वासा मुनी स्थिर राहू शकले नाही. ते थरथरत खाली बसले. कृष्णाने त्यांना हसत हसत विचारले, "बाबा! मी श्रीदामाला पराजित केले ना?" असे ते वारंवार विचारू लागले. परंतु, दुर्वासाजी काही उत्तर देऊ शकले नाही. ते स्तंभित आणि बिलकूल मौन झाले. कृष्णाने परत विचारले -"बाबा, वोलत कां नाही? मुकेतर नाही ना तुम्ही?" असे म्हणत



ते त्यांच्या मांडीवर बसले आणि त्यां दाढी पकडत म्हणाले, "बाबा! सांगा ना, मी जिंकलो आणि श्रीदाम पराजित झाला." परंतु, ऋषि काहीच बोलू शकले नाही. त्यांना मौन पाहून श्रीकृष्ण त्यांच्या मांडीवर बसून हावभाव करत हसू लागले. दुर्वासा त्यांच्या मुखात आपोआप बलपूर्वक ओढल्या गेले. तेथे त्यांनी कोटी-कोटी ब्रह्माण्डांना पाहिले, कोटी कोटी ब्रम्हा, विष्णु आणि महेशपण पाहिले. ते कधी ह्या ब्रह्माडांत प्रवेश करत होते, तर कधी त्या ब्रम्हांडांत. अशाप्रकारे फिरत-फिरत जणु कोटी-कोटी युग निघून गेले. सौभाग्यवश ते एका अश्या ब्रम्हांडांत पोहोचले जेथे श्रीकृष्णाची प्रकट लीला होत होती आणि त्या लीलेमध्ये पूर्ववत ते श्रीकृष्ण आणि सखांपाशी आले. त्याचवेळी कृष्णाने हसून तोंड उघडातच ते बाहेर आले. दुर्वासा मुनी कृष्णाचे असे अद्भुत चरित्र पाहून त्यांच्या चरणावर पडले आणि स्तव-स्तुति करू लागले. कृष्णाच्या कृपेने त्यांचे जीवन कृतकृत्य झाले. कृष्ण केवळ नंदनंदन आहेत की परब्रह्म आहेत, ही त्यांची शंका दूर झाली. आता ते श्रीनंदनंदनालाच परमपरात्पर ब्रह्म-स्वयं-भगवान समजून आणि कोटीकोटी दण्डवत प्रणाम करून आपल्या आश्रमात परतले. श्रीकृष्ण पण भक्तावर कृपा करून ग्वालबालांबरोबर खेळत तेथून दुसरीकडे निघून गेले.

* * *

एके वेळी प्रसिद्ध दुर्वासामुनी गोपराज वृषभानु महाराजांच्या राजभवनात आले. ते काही दिवस तेथेच राहिले. वृषभानु महाराजांनी आपली सर्वगुण-संपन्न लाडकी सुपुत्री कुमारी राधिकेला त्यांच्या सेवा-सुश्रुषा कार्याता नियुक्त केले. राजकुमारी राधिकेची प्रीतिपूर्ण सेवा-शुश्रुषेने महर्षि खूपच खूश झाले आणि आशीर्वाद देत म्हणाले, "मुली, तु पाककलेत खूप निपुण होशील, तुझ्या हाताने बनवलेली खाद्य-सामग्री अमृताहूनही सुस्वादु होतील आणि बल, आयु, बुद्धि, सौंदर्य तथा आयुष्याचे वर्धन करेल. त्याचे सेवन करणारा व्यक्ति कोणाकडूनही पराजित होणार नाही, त्याच्या शरीराची कांति कधीच क्षीण होणार नाही." असे म्हणून ते आपल्या आश्रमाला परतले. व्रजमध्ये सर्वत्रच राधिकेच्या पाक-कलेची निपुणता प्रसिद्ध झाली.

यशोदा मातेने पण व्रजवासींकडून विशेषतः पौर्णमासीकडून राधिकेच्या पाक-कलेची सिद्धता आणि तिच्या द्वारे बनवलेल्या पक्वान्नांचा प्रभाव ऐकला होता. ती कृष्णाला श्रीमती राधिकेने बनवलेले सुस्वादु खाद्य पदार्थ खायला देवू इच्छित होती. तिने विचार केला की कसे पण श्रीमती राधिकेला आपल्या

राजभवनात बोलवून स्वयंपाक करण्यास सांगावे. माझा मुलगा खूपच बारीक आणि कमजोर आहे, भोजनात त्याची रूचि नाही आहे. इकडे नेहमी विविध प्रकारच्या योग आणि आसुरी मायेने युक्त दैत्यांशी त्याच सामना पडत असतो. असा विचार करून योगमाया पौर्णमासी, कुंदलता, विशाखा इत्यादिंच्या सहाय्यतेने जावटमध्ये राहणाऱ्या राधिकेच्या सासू जटिलेला समजवून श्रीमती राधिकेला दररोज आपल्या घरी बोलवत असे. गौडीय गोस्वामींच्या ग्रंथांत याचे विस्तृत वर्णन सुरक्षित आहे.

* * *

युतक्रीडेत कपटपूर्वक धर्मात्मा पांडवांना हरवून पापाचारी दुरात्मा दुर्योधनाने दुःशासन, कर्ण आणि शकूनीचा परामर्ष आणि सहाय्य घेवून बारा वर्षांपर्यंत त्यांना वनवासाला पाठवले होते. पांडव त्यावेळी काम्यवनात निवास करी होते. ते कसे तरी भिक्षावृत्ती करून जीवन निर्वाह करत असत आणि भगवंतांच्या लीला कथेचे स्मरण, चिंतन, कीर्तन इत्यादि करत जीवन सुखपूर्वक व्यतीत करत होते. दुष्ट दुर्योधन, कपट विद्येमध्ये निपुण कर्ण आणि दुःशासन इत्यांदिच्या सोबत वेगवेगळ्या उपायांनी पांडवाना संकंटात घालंण्याची युक्ति करीत असे. त्याचवेळी महातेजस्वी महर्षि दुर्वासा दहा हजार शिष्यांना सोबत घेवून स्वेच्छेने तेथे उपस्थित झाले. परम-क्रोधी दुर्वासा मुनींना आलेले पाहून दूर्योधनाने फार नम्रतेने त्यांना अतिथि म्हणून निमन्त्रित केले. दुर्योधन स्वतः दासाप्रमाणे खूप सावधानीपूर्वक दिवस-रात्र आळस सोडून त्यांच्यां सेवेत लागला. मुनी खूप विचित्र स्वभावाचे होते. कधी सगळे झोपल्यानंतर मध्यरात्रीत भोजन मागत, नंतर स्नान करण्यासाठी निघून जात, परत येवून म्हणत की मी खाणार नाही, आज मला भूख नाही. असे म्हणून अदृष्य होत. कधीकधी सुस्वादु भोजनाची निंदा करत खाण्यास नकार देत. पण दुर्योधनाच्या मनामध्ये विकार वा क्रोध उत्पन्न झाला नाही. त्यामुळे ते कठीण-स्वभावाचे मुनी फार प्रसन्न झाले आणि म्हणाले. "मी तुला वर देवू इच्छितो, मनात जी काही इच्छा आहे ती मागून घ्या." दुर्योधन आपल्या दुष्ट मित्रांचा परामर्ष (सल्ला) घेवून, पहिल्यापासूनच वर मागण्यासाठी तयार होता. तो म्हणाला - "महर्षि! आमच्या कुळात महाराज युधिष्ठिर सर्वात जेष्ठ आणि श्रेष्ठ आहेत. ते धर्मात्मा पाण्डुकुमार आपल्या भावांसोबत काम्यवनात निवास करत आहेत. आपण कृपया ज्या प्रमाणे माझे



अतिथि झालात, तसेच आपल्या साऱ्या शिष्यांसोबत त्यांचे अतिथिव्हावे. माझी ही विशेष प्रार्थना आहे की आपण द्रौपदीच्या भोजनाच्या पश्चातच तेथे पोहोचावे." दुर्वासाजी तथास्तु म्हणून काम्यवनाकडे गेले.

दहा हजार शिष्यांसोबत क्रोधी आणि भयंकर मुनी काम्यवनामध्ये पांडवांच्या आश्रमावर पोहोचले. महाराणी द्रौपदी समस्त वैष्णव, ब्राम्हण, अतिथि आणि पाच पतिंना भोजन करवून स्वतःही भोजन करून सूखपूर्वक बसून विश्राम करत होती. महाराज युधिष्ठिर दुर्वासा मुनीना शिष्यांसोबत येताना पाहून उठून उभे राहिले आणि त्यांचे सर्व प्रकाराने स्वागत केले. त्यांची विधिपूर्वक पूजा करून त्यांना भोजनासाठी निमंत्रण दिले. ऋषि म्हणाले - "आम्ही सर्वजण स्नान करून लगेच परततो." असे सांगून ते जवळच्याच सरोवरात स्नान करण्यासाठी गेले.

इकडे धर्मभीरु पतिव्रता शिरोमणी द्रौपदीला खूप चिंता झाली. ती विचार करू लागली. "महर्षिंना काय जेवू घालणार? आश्रमामध्ये काहीच नाही आहे. खूप पुर्वीची गोष्ट आहे - धर्मराज युधिष्ठीरांच्या आराधनेने संतुष्ट होवून सुर्यदेवाने त्यांना एक पात्र दिले होते की त्या पात्रात शिजवलेले अन्न तो पर्यंत भरून राहायाचे, जा पर्यंत द्रौपदी सर्वांना जेवण घालून स्वतः जेवण करत नसे. पण तिच्या खाण्यापूर्वी हजारो अथवा अगणित अतिथींना भोजन दिल्यानंतर सुद्धा त्यातील अन्न समाप्त होत नसे. परंतु, आज फार चिंतेचा विषय हा होता की द्रौपदीने भोजनानंतर त्या पात्राला पण उत्तम प्रकारे धुवून ठेवले होते. सर्वजण फार चिंतेत होते, कोणताच उपाय सूचत नव्हता. शेवटी द्रौपदी मनातच कंस-निषूदन, आनंदकंद भक्तवत्सल भगवान श्रीकृष्णांचे स्मरण करू लागली. द्रौपदीचा आक्रोश ऐकून भले कृष्ण कसे राहू शकत होते. ते पलंग सोडून लगेच तेथे उपस्थित झाले.

द्रौपदीच्या शरीरात जणु नवीन प्राणांचा संचार झाला. तिने कृष्णाला प्रणाम करून दुर्वासा मुनींच्या आगमनाचा समाचार दिला आणि उपस्थित विपत्तिपासून रक्षा करण्यासाठी प्रार्थना करत म्हणाली - "हे भक्तवत्सल! मी तुम्हाला शरण आली आहे. आपण सर्वांचे आश्रय आहात. आपणच परात्पर, समस्त ईश्वरांचे पण ईश्वर आणि सर्वसमर्थ आहात, अतः वर्तमान संकटातून आमची रक्षा करा."

तेव्हां भगवान श्रीकृष्ण म्हणाले. "मला खूप भूक लागली आहे, मी

भूकेने पिडित आहे. अतः सर्वप्रथम मला लगेच काहीतरी खायला दे." त्यांचे बोलणे ऐकून द्रौपदी खूप लज्जित झाली. तिने सांगितले. "भगवान! सूर्यदेवांने दिलेल्या पात्रातून अन्न समाप्त झाले आहे. सर्वांना खायला-प्यायला घालून माझेपण भोजन आहे." कृष्णाने द्रौपदीकडून पात्र मागवले. त्यामध्ये हिरव्या भाजीच्या पानाचा एक छोटासा तुकडा चिकटला होता. आपल्या बोटांनीं श्रीकृष्णानी त्याला काढून खाल्ले आणि पोट भरून पाणी पिऊन आणि ढेकर देऊन म्हणाले की या भाजीने संपूर्ण विश्वाचे आत्मा, यज्ञांचे भोक्ता सर्वेश्वर भगवान श्रीहरि तृप्त आणि संतुष्ट होवोत. तत्पश्चात मुनींना बोलावण्यासाठी सहदेवाला पाठवले. मुनीलोक त्यावेळी सरोवरात स्नान करून मंत्राचा जप करत होते. अकस्मात त्यांना जणु अन्न-रसयुक्त भोजन केल्याप्रमाणे वारंवार ढेकरा यायला लागल्या, त्यांचे पोट पूर्णरूपाने भरले. ते सगळे मुनी दुर्वासा कडे बघून म्हणाले - "आमचे पोट पूर्णरूपाने भरलेले आहे. आता आम्ही युधिष्ठिर महाराजांकडे भोजन करण्यास असमर्थ आहोत." दुर्वासांनी विचार करून सांगितले, "मुनी! दुष्ट दुर्योधानाचे अन्न खावून त्याच्या परामर्षाने महात्मा पाण्डवांच्या प्रति आम्ही महान अपराध केला आहे. मी परम भक्त अम्बरीश महाराजांचा प्रभाव स्मरण करून भयभीत होतो आहे. पाण्डवांच्यां अपराधाने आपला सर्वनाश न होवो, अतः इथून पळण्यातच आमचे कल्याण आहे." असे म्हणून ते सर्व मुनींसोबत तिथून इकडे-तिकडे दहा दिशांना पळाले.

सहदेवांने त्यांना सर्वत्र शोधले, पण मुनीं कोठेही दिसले नाहीत. ते त्या सरोवराच्या निकट राहाणाऱ्या जवळपासच्या तपस्वी मुनींच्यांमुखातून त्यांच्या पळण्याचा समाचार ऐकून युधिष्ठिरापाशी आले आणि सारा वृत्तांत त्यांना निवेदन केला. श्रीकृष्णाच्या कृपेने पांडवांचे संकट टळले. नीट विचार केला तर असे वाटेल की दुर्वासा मुनी परम भगवद्भक्त आहेत. कधीकधी ते ज्ञानी आणि योगीजनांपेक्षा भक्तांच्यां श्रेष्ठतेचे प्रतिपादन करण्यासाठी विविध प्रकारच्या अद्भूत उपायांचे अवलम्बन करतात, जे साधारण लोकांना समजणे कठीण आहे.

* * *

एकदा सणांनिमित्त सर्वगोपीजण वृंदावनातून महर्षि दुर्वासांच्या दर्शनासाठी यमुनेच्या पलीकडे दुर्वासा आश्रमामध्ये जाऊ इच्छित होत्या. त्यांच्यां डोक्यांवर गोड-गोड सुस्वादु पक्वानांनी भरलेल्या मोठ-मोठ्या थाळ्या होत्या. ज्यावेळी त्या यमुनेच्या तीरावर आल्या, तेव्हां त्यांनी पाहिले की यमुनेला पूर



आला आहे आणि मोठ-मोठ्या लाटा उसळत आहेत. पलीकडे जाण्यासाठी एकही नाव नव्हती. खूपच भीषण स्थिति होती, तेवढ्यात त्यानीं श्रीकृष्णाला कुठूनतरी आपल्याकडे येतांना पाहिले. कृष्णाने विचारले की आपण कोठे जाता आहात? गोपींनीं उत्तर दिले - "आम्ही दुर्वासा मुनींच्या दर्शनासाठी नदीच्या पलीकडे जाऊ इच्छितो, परंतु यमुनेला भयानक पूर आल्यामूळे आम्ही फार चिंतेत आहोत. आपणच सांगां आम्ही यमुना कशी पार करणार?" श्रीकृष्ण गंभीर होवून म्हणाले, "तुम्ही यमुनेला सांगा की जर कृष्णाने कधीच स्त्रीकडे पाहिले नसेल, कधी स्त्रियांचा संग केला नसेल तर कृष्णाच्या या प्रभावाने आम्हाला तुझ्यावरून त्यापार जावू दे."गोपीजनांनी तसेच केले. त्यांनी यमुनेला प्रणाम करून कृष्णाने जसे सांगितले होते, तसेच निवेदन केले आणि सर्व गोपीजनांनी यमुनेच्या पाण्यावरून चालत-चालत त्यांनी तिला पार केले आणि दुर्वासा ऋषिंच्या आश्रमात पोहोचल्या.

गोपीजनांनी ऋषिंना श्रद्धापूर्वक प्रणाम करून आपल्याबरोबर आणलेल्या सर्व विभिन्न प्रकारच्या पक्वानांना अर्पण केले. क्षणभरातच ऋषिंनी सारे पक्वान्न खाऊन टाकले, प्रसाद म्हणूनही काही ठेवले नाही आणि गोपीजनांना जो मनोभीष्ट आशीर्वाद दिला. जेंव्हा सर्व गोपीं जाण्यास तयार झाल्या, तेव्हां त्यांनी दुर्वासा महर्षिंना यमुना पार करण्याचा उपाय विचारला? तेव्हा दुर्वासा मुनींनी विचारले की आपण येत असताना यमुना कशी पार केली? गोपींनी उत्तर दिले - "श्रीकृष्णांच्या निर्देशानी आम्ही यमुनेला सांगितले की जर कृष्णाने कधीच कोण्यत्याही स्त्रीचा संग केला नसेल अथवा स्त्रीकडे पाहिले पण नसेल, तर त्याच्या प्रभावाने आम्हाला यमुनेच्या पार जाता यावे. यमुनेने रस्ता दिला. असे सांगितल्यावर यमुनेने आम्हाला मार्ग अर्पण केला आणि आम्ही पायीच यमुनेला पार केले. दुर्वासा-मुनी म्हणाले - "तुम्ही यमुनेच्या जवळ हे सांगा की जर महर्षि दुर्वासाने जीवनभर कधीच काही खाल्ले नसेल, तर त्यांच्या त्या प्रभावाने आम्ही आपल्याला पायीच पार करून जाऊ शकू."सर्व गोपींनी तसेच केले आणि सहजच यमुनेला पार करून परत आल्या.

गोपीं परत आल्यावर जेंव्हा श्रीकृष्णाला भेटल्या, तेंव्हा त्यांनी श्रीकृष्णाला प्रश्न केला की भगवंत आपण आणि दुर्वासामुनी दोघेही खरच फार विचित्र आणि समजण्यास दुर्बोध आहात. दिवसरात्र गोपींच्या बरोबर राहाणारे आपण कधीच स्त्री दर्शन करीत नाही आणि दुर्वासा-मुनी आम्ही आणलेले सर्व

पक्वान्न खावूनसुद्धा कधीच काही खात नाहीत. आपल्या दोघांच्या वचनांना आम्ही समजू शकत नाही." कृष्ण म्हणाले, "मी सर्व काही करून सुद्धा काही करीत नाही. माझ्यामध्ये संसारी लोकांप्रमाणे कर्तापणाचा व भोक्तापणांचा अभिमान नाही आहे. दुर्वासामुनींजवळ पण स्थुल अथवा सूक्ष्म शारिरिक अथवा मानसिक कर्ता आणि भाक्तारूप स्थूल अभिमान नाही, ह्याच कारणास्तव ते सर्व खावूनसुद्धा ते काहीच ग्रहण करीत नाहीत. यामूळे सामान्य लोकांनां आम्हा दोघांना समजणे कठीण आहे. विरळे तत्वज्ञानीच याला समजू शकतात." कृष्णांनी गोपीजनांच्या माध्यमाने जगताला या तत्त्वाची शिक्षा दिली.

* * *

एका वेळेची गोष्ट आहे, एक अद्भूत ब्राह्मण द्वारकेत आले. अंगावर चिधंढ्याना घालून हातामध्ये बेलाची छडी घेऊन ते फिरत होते. त्यांची दाढी आणि मिशीपण वाढली होती. ते दुसरे कोणी नव्हे तर दुर्वासा मुनीच होते. दुर्वासा शब्दाचा अर्थ आहे की जुन्या फाटलेल्या चिधंढ्याना शरीरावर धारण करणारे आणि केवळ दुर्वा गवताचा रस पिऊन जिवीत राहाणारे. दुर्वासा मुनी कधी कधी फक्त दूर्वा खाऊनच प्राण रक्षण करीत असत. ते कधी मळलेल्या-खराब चिधंढ्याना धारण करून लज्जा निवारण करत असत, या कारणास्तव त्यांना दुर्वासा मुनी या नावाने ओळखले जात असे.

दुर्वासा मुनी मोठमोठ्या राजमार्गात, गल्लीत आणि चौकात फिरून उच्च स्वरात म्हणत होते, या दुर्वासा ब्राह्मणाला कोण आपल्या घरात सत्कारपूर्वक ठेवणार? मी खूपच क्रोधी आहे. जो मला घरात ठेवेल, त्याला माझी सेवा क्रोध न करता करावी लागेल. असे ऐकून जेव्हां कोणीही त्यांना घरात ठेवण्यास तयार झाले नाही, तेव्हां भगवान श्रीकृष्णांनी त्यांना आपल्या राजभवनामध्ये अतिथि म्हणून आणले आणि त्यांची स्वतः यथोचितपणे सेवा करणे सुरु केली. कधी हजार लोकांचे जेवण एकटेच खायचे, तर कधी अयोग्य वेळी जेवण मागायचे, कधी खूप अधिक खायचे, कधी विनाकारणच खूप राग करून बसायचे, तर कधी अकस्मातच जोर-जोराने रडू लागायचे, तर कधी अचानकच हसायला लागायचे. एके दिवशी त्यांनी आपल्या निवासस्थानात ठेवलेल्या गाद्या, चादरी आणि वस्त्र-आभूषणांनीं अलंकृत सुन्दर कन्यांना भस्म करून टाकले आणि स्वतः तेथून पसार झाले. थोड्या वेळानंतर श्रीकृष्णाजवळ येवून म्हणाले, "कृष्णा! मी खुपच



भुका आहे, मला त्वरित स्वादिष्ट खीर खाण्यास दे."

श्रीकृष्ण तयारीतच होते. त्यांनीं मुनींना त्याचवेळी स्वादिष्ट खीर खाण्यास दिली. ऋषिंनी थोडीशी खीर खाऊन श्रीकृष्णाला आदेश दिला की तु या गरमागरम खीरेला आपल्या साऱ्या शरीराला लेपून घे. श्रीकृष्णांनी तसेच केले. त्यांनी आपल्या डोक्यापासून सर्व शरीरावर त्या उष्ट्या खीरीला लेपून घेतले आणि पुढे हसत उभ्या असलेल्या रुक्मिणीच्या सर्वांगावर पण खीरीचा लेप लावला. एवढ्यात या विचित्र मुनींनीं समोर उभ्या असलेल्या एका रथाशी महाराणी रुक्मिणींला घोड्याऐवजी जुंपंले आणि स्वयं त्या रथावर बसून रुक्मिणींला चालण्यास आदेश दिला. दुर्वासा मुनी आपल्या तेजामूळे अग्निप्रमाणे दैदीप्यमान दिसत होते. ते कृष्णासमोरच भोळ्या-भाबड्या, मृदु रुक्मिणीला चाबकाने मारू लागले. हे पाहून यादवांना खूपच राग आला. बिचारी रुक्मिणी रस्त्यातच खचून पडली, परंतु दुर्बोध मुनीनी तिला चाबकाने हाकणे सोडले नाही. जेव्हां ती उठू शकली नाही, तेंव्हा दुर्वासा-मुनी रथातून उडी मारून पायीच पळू लागले. श्रीकृष्ण त्याच अवस्थेत शरीरावर लेपलेल्या खीरीसकट त्यांच्यां पाठीमागे पळत-पळत म्हणू लागले, भगवन! आपण प्रसन्न व्हावे. दुर्वासाजी कृष्णाकडे पाहून म्हणाले, "महाबाहो श्रीकृष्ण! तुम्ही स्वभावाने क्रोधाला जिंकले आहे, हे गोविन्द! मी तुझा कोणताही अपराध इथे पाहायला नाही. मी तुझ्यावर खूपच प्रसन्न आहे. अतः तु माझ्याकडून मनोवांछित वरदान मागून घे. तिन्ही लोकांत अनंत काळपर्यंत तुझी पवित्र किर्ती राहील आणि तिभुवनात तुझे प्राधान्य राहील. तुझ्या ज्या ज्या वस्तु मी तोडल्या-फोडल्या, जाळल्या वा नष्ट केल्या असतील, त्या पूर्ववत होवोत. तुझ्या शरीरावर ज्या ज्या भागात खीर लागली आहे त्या अंगाला मार लागला तरी तुला मृत्युचे भय रहाणार नाही. हे अच्युत! जो पर्यंत तू या जगात राहू इच्छितोस तो पर्यंत अजरामर राहशील. पण तु तुझ्या पायांच्या तळव्यांना उष्टि खीर नाही लावलीस. तू असे का केलेस? तुझे हे कार्य मला प्रिय वाटले नाही. तत्पश्चात कृष्णाचे शरीर अद्भुत-कांतिमय झाले, ऋषिंनी नंतर रुक्मिणीला आशीर्वाद दिला. ते म्हणाले, "पुत्री रुक्मिणी, तु संपुर्ण विश्वाच्या स्त्रियांमध्ये परम यशस्विनी होशील आणि समस्त लोकांत तु सर्वोत्तम कीर्तीला प्राप्त करशील. तुला वृद्धावस्था अथवा रोग कधीच येणार नाही. तुझ्या शरीराची कांति कधीच निस्तेज होणार नाही. तु कृष्णाच्या सोळा हजार राणीमध्ये प्रधान

आणि कृष्णाची सर्वात प्रियतमा होशील. असे म्हणून दुर्वासा-मुनी लगेच अतंर्धान झाले.

* * *

अचिन्त्य-प्रभाव-संपन्न भगवान श्रीकृष्णाने चतुराईने कौरव आणि पांडवांच्या मध्ये महाभारताचे युद्ध करवून पृथ्वीचा भार मोठ्या प्रमाणावर उतरवाला. श्रीबलदेवाबरोबर राहून स्वयं कृष्णानेपण अनेक भूभारस्वरूप असूर श्रेणींच्या राजांचा संहार केला, परंतु दुर्जेय यदुकूल विद्यमान असल्या कारणाने कृष्ण निश्चिंत होऊ शकले नव्हते. ते यदुकुलाचापण नाश करून निश्चिंतपणे स्वधामाला परत जाऊ इच्छित होते. साधारणतः शास्त्राचे मत आहे की जे लोक भगवंतांची सेवा करतात ते दैवी स्वभावाचे साधु अथवा भक्त म्हणवले जातात. याच्या विपरीत कृष्णसेवेच्या विमुख असुरांना दैत्य म्हटले जाते. दैत्य अथवा असुरगण स्वाभाविक रूपाने कृष्णाचा नाश करण्याचा प्रयत्न करतात. अश्या दैत्य-दानवांच्या संहार-कार्याद्वारेच श्रीकृष्णाचे युगावताराचे कार्य संपन्न होते. अधिकांश लोकांची ही धारणा आहे की भगवंताचा अंश असल्याने यदुवंश पृथ्वीला भार होऊ शकत नाहीत, कारण त्यांच्यामध्ये भगवंताच्या सेवेची कामना स्वभावजन्य आहे. पण, या विषयाला समजण्याचा नीट प्रयत्न केला पाहिजे की कौरव आणि पांडव पण श्रीकृष्णाचे नातेवाईक आणि कुटुंबी होते. ते काही पृथ्वीचा भार वाढविण्याकरता आविर्भूत झाले नव्हते. परंतु, त्यापैकी पांडव श्रीकृष्णाचे सेवक होते. ते सदा सर्वदा सेवेत तत्पर असत, परंतु दुर्योधन इत्यादि कृष्णाचे नातेवाईक असून सुद्धा दुष्ट स्वभावाचे महा-अत्याचारी, कृष्णाला विमुख दैत्य-दानवच होते. महाभारताच्या युद्धात भगवान श्रीकृष्णाने चतुरपणे भगवत-विमुख अशा दैत्य-दानवांचा संहार करून पृथ्वीचा भार उतरवला होता.

यदुवंशामध्ये भगवान श्रीकृष्णाच्या सेवेत तत्पर असे जे त्यांचे परिकर होते, त्यांनी सर्वांनी भगवंताबरोबरच अप्रकट लीलेमध्ये प्रवेश केला होता. परंतु कृष्णापासून विमुख झालेले यादवगण जनसामान्यांच्या दृष्टित आपल्यालाही कृष्णाच्या समान पूज्य समजून भ्रम पसरवत होते. केवळ अश्याच कृष्ण-विमुख यादवांचो परस्पर कलहाद्वारे नाश करून पृथ्वीचा अवशिष्ट  भारपण श्रीकृष्णांने दुर केला. परस्पर कलहामूळेच कौरव पाण्डवांचे युध्द झाले होते आणि त्या युद्घात मारल्या गेलेल्या दोन्ही पक्षाच्या योद्धयांमध्ये श्रीकृष्णाला विमुख असण्याः या व्यक्तिंचाच संहार संभव झाला होता. पण, श्रीकृष्णाने या दोन्ही युद्धांत कृष्ण-सेवा



तत्पर भक्त अथवा परिकरांचा संहार करवला नाही. त्यात केवळ पृथ्वीच्या भारस्वरूप दैत्य-दानवांचा संहार करवून पृथ्वीचा भार कमी केला होता. वास्तविक यदुवंशाची ध्वंस-लीला इन्द्रजाळाप्रमाणे होती, या युद्धामूळे सर्व कृष्णाचे परिकर नित्य धामात उपस्थित झाले आणि बाकीचे असुर स्वभावाचे यादव मारले गेले होते.

महाभारताच्या युद्धाला छत्तीस वर्ष झाली होती. कृष्ण आपल्या परिकरांसोबत द्वारकेमध्ये नाना प्रकारच्या लीला करीत सुखाने रहात होते. आता ते काळरूपानेच तेथे निवास करीत होते. आता त्यांनी आपली लीला संवरण करण्याची इच्छा केली. त्यांच्या प्रेरणेने विश्वामित्र, असित, कण्व, दुर्वासा, भृगु, अंगिरा, अत्रि, वशिष्ठ, नारद इत्यादि सर्व मुनीजन द्वारकेच्या जवळ पिण्डारक नामक तीर्थक्षेत्रात एकत्रित होवून भगवद्कथा गुणगान करण्यात मग्न होते. एके दिवशी यदुवंशाचे काही उद्दण्ड मुले खेळत-खेळत त्यांच्याजवळ आली.

त्यांनी बनावटी नम्रतेने त्यांच्या चरणी प्रणाम करून त्यांना प्रश्न केला. त्यांनी जाम्बवती-नन्दन सांबला स्त्री वेशात सजवून आणले. "हे ब्राम्हण देवता! ही काळ्या डोळ्यांची सुन्दर गर्भवती मुलगी आहे. ही एक प्रश्न विचारू इच्छिते, परंतु स्वतः विचारण्यास लाजते आहे. आपल्या सगळ्यांचे ज्ञान अपार आहे, आपण सर्वज्ञ आहात. हिला पुत्र-प्राप्तिची खूप लालसा आहे, हिच्या प्रसवाची वेळपण जवळ आलेली आहे. अतः आपण लोक सांगा की हिला पुत्र होणार की कन्या?" प्रथमतर मुनीगण गुपचुप राहिले, परन्तु जेंव्हा कुमारांनी त्या ऋषि-मुनींना धोका देण्यासाठी वारंवार प्रश्न विचारण्यास आरंभ केला, तेंव्हा ते भगवत-प्रेरणेने क्रोधित झाले. त्यांच्यामध्ये संहारकर्ता महादेव शंकराचे अंशभूत महर्षि दुर्वासा सर्वात अग्रणी होते. ते म्हणाले, "मुर्खांनो! ही मुलगी अश्या एका मूसळाला जन्म देईल की ज्या मुसळाद्वारे तुमच्या कूळाचा नाश होईल. मुनींचे शब्द ऐकून ते बालक फारच घाबरले. त्यांनी लगेचच सांबाचे पोट उघडून पाहिले तर खरोखर त्यातून एक लोखंडांचे मूसळ बाहेर पडले. ते सर्व घाबरले आणि त्या मूसळाला घेवून राजा उग्रसेन जवळ गेले आणि झालेली सर्व घटना महाराजांना सांगिंतली. महाराज उग्रसेन आणि द्वारकावासी आपल्या डोळ्यांनी त्या मूसळाला पाहून विस्मित आणि भयभीत झाले, कारण त्यांना माहित होते की ब्राम्हणांचा शाप कधी व्यर्थ होत नाही.

महाराज उग्रसेनांनी त्या मूसळाचा चूरा केला आणि त्या चूः यालाआणि

लोखंडांच्या बाकी राहिलेल्या छोट्याश्या तुकड्याला समुद्रात फेकून दिले. त्या लोखंडांच्या तुकड्याला एका मासळीने गिळले. चूरा लाटांबरोबर वाहून समुद्राच्या किनाऱ्यावरआला. थोड्याच दिवसात ते सर्व एरक (गाठ नसलेल्या गवताप्रमाणे) उगवले. ती मासळीपण अन्य मासळींबरोबर कोळ्यांच्या जाळ्यामध्ये पकडली गेली. तिच्या पोटात जो लोखण्डाचा तुकडा होता, त्याला जरा नावाच्या पारध्याने आपल्या बाणाच्या टोकावर लावले. भगवान सर्वकाही जाणत होते. ते त्या शापाला परिवर्त्तित पण करू शकत होते, पण तरी सुद्धा त्या काळरूपधारी प्रभूंनी ब्राह्मणांच्या शापाचे अनुमोदन केले.

द्वारकेमध्ये मोठमोठाले उत्पात होवू लागले. ह्या अपशकूनांना पाहून श्रीकृष्ण काही वयस्क लोकांना द्वारकेतच सोडून सगळ्या यादवांना सोबत घेवून पिण्डारक तीर्थात स्नान आणि दान-पुण्य करण्यासाठी आले. स्नान आणि दान-पुण्याच्या पश्चात भगवंतांच्या प्रेरणेने सर्व यादव मैरेय नावाचा मधु पिऊन परस्परात लढू लागले आणि त्यांनी क्रोधवश समुद्राच्या तटावर उगलेल्या एरक नावाच्या लाठ्यांना घेवून एक दुसऱ्यांचा संहार करू लागले. हे पाहून बलराम प्रभू समुद्रतटावर उपस्थित होवून तेथून स्वधामाला निघून गेले. श्रीकृष्णपण भक्त उद्धव आणि मैत्रेयजींना उपदेश देवून जरा नामक व्याधाद्वारे सोडलेला बाण लागण्याचे निमित्त बनवून सपरिकर, सशरीर गोलोक वृंदावनात परतले. यदुवंशांमध्ये उत्पन्न असुर स्वभाव-संपन्न लोक त्या कलहात मारले गेले. अशा प्रकारे पृथ्वीचा भार उतरवून कृष्ण स्वधामी गेले. या मूसळ-संहार-लीलेमध्ये दुर्वासा आदि ऋषि केवळ निमित्त कारण होते, वास्तविकतः भगवत-इच्छाच प्रधान होती. महर्षि दुर्वासा श्रीशंकराचे अवतार अथवा प्रकाश आहेत. शंकर ईश्वर असल्याकारणाने त्यांचे निवास स्थान ईशापूर नावाने प्रसिध्द आहे. वर्तमान काळी दुर्वासा आश्रम ईशापुरमध्ये स्थित आहे.

## श्री दत्तात्रेय भगवंताचा आश्रम

दुर्वासा ऋषींच्यां आश्रमाजवळच यमुनेच्या तटावर श्रीदत्तात्रेयांचा आश्रम आहे. दत्तात्रेय भगवान विष्णुंचे अंशांवतार आहेत. हे पण अनुसूयेच्या तीन पुत्रापैकीं एक आहेत. श्रीमद्भागवताच्या सप्तम स्कन्धात यांचा नामोल्लेख येतो. त्यांनी प्रल्हाद महारांजाना वर्णाश्रम धर्म तथा तत्वज्ञानाचा उपदेश दिला होता.



श्रीमद्भागवताच्या एकादश स्कंधात पण त्यांचे चरित्र वर्णन केले आहे. भगवान श्रीकृष्णांनी आपल्या अप्रकट लीले पूर्वी भक्त उद्धवांना उपदेश देतेवेळी अवधूत दत्तात्रेयांना आणि यदु महाराजांना संवाद ऐकवला होता. ह्या संवादामध्ये सत्ययुगामध्ये अवधूत दत्तात्रेयांनी आपल्या चौवीस शिक्षा गुरुंचा उल्लेख करून महाराज यदुला तत्वज्ञानाचा उपदेश दिला होता. जेथे दत्तात्रेयांचा आश्रम होता, ते स्थान आजकाल विष्णुपुर नावाने प्रसिद्ध आहे. द्वापरमध्ये नावाडी लोकांची येथे वस्ती होती आणि आज ही या गावात नावाड्यांचेच प्राधान्य आहे.

## श्रीपराशर मुनी आणि त्यांचा आश्रम

दुर्वासा मुनींच्या आश्रमाजवळच पराशर मुनींचा आश्रम होता, जो की नानाप्रकारच्या फळ-फुलांनी युक्त वृक्ष आणि वेलींद्वारे सुशोभित परम रमणीय होता. कालक्रमानंतर यमुनेच्या प्रवाह व भूक्षरणामूळे वर्तमान काळात त्या आश्रमाचे कोणतेही चिन्ह मिळत नाही. पण शास्त्रांच्या अनुसार द्वापरच्या अंतपर्यंत पराशर मुनींचा आश्रम कोठे तरी जवळच होता.

ब्रह्माजींचा मानस पुत्र ब्रह्मर्षि वशिष्ठ, त्यांच्या एका पुत्राचे नाव शक्ति ऋषि असे होते.  पराशर शक्ति ऋषिंचे पुत्र होते. त्याच्या आईचे नाव अदृश्यन्ती असे होते. वशिष्ठांनींच स्वतः आपल्या पुत्राचे सर्वप्रकारे लालन पालन केले होते. त्यांचे संपुर्ण संस्कार पण पितामह वशिष्ठांनींच संपन्न करवले होते.

धर्मात्मा पराशर वशिष्ठांनांच आपले वडील मानत असत आणि जन्मापासून त्यांच्यां प्रति पितृभाव ठेवत असत. जेंव्हा त्यांनी आपल्या आईकडून हे ऐकले की मुला! वशिष्ठ तुझे वडील नाहीत, परंतु  वडीलांचे वडील आहेत. तुझ्या वडीलांना तर वनात राक्षसांनी खाऊन टाकले होते, तेव्हां असे ऐकून पराशर मुनी दुःखाने आतुर झाले. त्यांनी तपस्येद्वारे सर्व ब्रह्मांडांना नष्ट करण्याचा विचार केला, पण वशिष्ठ मुनींनीं तत्वज्ञान देवून त्यांना तसे करण्यापासून थांबंवले.

पराशर मुनी खूप मोठे तपस्वी आणि परमभक्त होते. समाजाच्या कल्याणार्थ त्यांच्यांद्वारे लिखित पराशर स्मृति, अठरा स्मृतिंमधील एक प्रमुख स्मृति आहे, ज्याच्याद्वारे आजपण भारतीय हिन्दू समाज संचालित होत आहे.

एकेवेळी पराशर मुनी तीर्थयात्रा करीत यमुनाच्या किनाऱ्यावर उपस्थित

झाले. ते यमुना पार करून आपल्या आश्रमात जाऊ इच्छित होते. संध्यांकाळ झाली होती. त्यांनीं पाहिले की एक कुमारी नौकेद्वारा लोकांना नदी पार करवत होती. पराशर एकटेच होते. ते तिच्या नावेत बसून यमुनापार करू लागले.

ती नाव चालवणारी युवती दुसरी कोणी नसून मत्स्यगंधा होती. मत्स्यगंधा उपरिचर वसुच्या वीर्याद्वारे ब्रम्हाजींच्या शापाने मासळी बनलेल्या अद्रिका नावाच्या अप्सरेच्या गर्भातून उत्पन्न झाली होती. नावाडी लोकांनी मासळीच्या पोटातून हिला प्राप्त केले होते. ह्याच कारणास्तव हिचे नाव मत्स्यगंधां झाले होते. नावाड्यांच्या सरदाराने हिला आपली पुत्री समजून हिचे पालन-पोषण केले होते. ही परम-सुंदर होती. सत्य आणि नाना प्रकारच्या सद्गुणांनी संपन्न असल्या कारणाने ही सत्यवती या नावाने प्रसिद्ध झाली. वडीलांच्या सेवेत मदत म्हणून यमुनेत नाव चालवत असे. पराशर मुनी तिचे मनमोहक रूप-सौंदर्य पाहून मोहित झाले. त्यांनी तिच्याबरोबर समागम करण्याची इच्छा व्यक्त केली. परंतु सुशील स्वभावाच्या आणि सदाचार संपन्न मत्स्यगंधेने सरळ हृदयाने सांगितले, "पुज्य! कन्याभाव दूषित झाल्यावर मी घरी कशी जाणार? मुनीवर! मी कलंकित झाल्यावर जिवित राहू इच्छित नाही."

मत्स्यगंधेने असे म्हटल्यावर मुनीश्रेष्ठ पराशर म्हणाले की तुला माझ्याकडून जो वर पाहिजे मागून घे. पुत्र झाल्यावरपण सुद्धा तुझे कौमार्य अतुट राहिल. तुझ्या शरीरातून जो मासळीचा वास येतो, तो दूर होईल आणि उलट त्याच्या बदली तुझ्या अंगातून उत्तम सुगंध येईल, जो एक योजन भूमंडलावर दरवळेल. तुझ्या गर्भातून भगवंताचा अंश जन्म ग्रहण करेल, हे जे काही झाले, ते सर्व भगवंताच्या इच्छेनेच झाले आहे, असे म्हणताच पराशर मुनींच्या दिव्य तेजापासून तिला गर्भ राहिला आणि लगेचच एका महाद्भूत शिशुचा जन्म झाला. बघता-बघता ते सोळा वर्षाच्या युवावस्थेला प्राप्त झाले. हे पराशरनंदन नंतर कृष्णद्वैपायन वेदव्यास या नावाने प्रसिद्ध झाले. ह्यांचा यमुनेच्या द्वीपात जन्म झाला, म्हणून 'द्वैपायन' आणि वेदांचे विभाजन केले म्हणून वेदव्यास या नावाने प्रसिद्ध आहेत. पराशरनन्दन व्यासादेवांनी माता सत्यवतीला हे आश्वासन दिले - "जेंव्हा कधीही तु मला बोलवशील, त्यावेळी लगेच तुझ्या निकट उपस्थित होवून मी तुझी अभिलाषा पूर्ण करेन." असे म्हणून ते यमुनेच्या द्वीपातून लगेचच तपस्येसाठी कुठे अन्यत्र निघून गेले.

त्यानंतर सत्यवतीपण प्रसन्नतापूर्वक आपल्या घरी परतली. तिचे वडील



दाशराज तिच्या शरीराच्या सुगंधाचा वास घेवून खूप प्रसन्न झाले.

असे म्हटले जाते की व्यासांनी मथुरेतील यमुनेच्या कृष्णगंगा घाटावर स्थित आपल्या आश्रमात राहून श्रीमद्भागवतासारख्या रसपूर्ण अमल महापुराणाला समाधित प्राप्त केले आणि जगाच्या कल्याणासाठी येथेच प्रकाशित केले. याचे कारण हे आहे की व्रजधामात वास केल्याशिवाय अथवा स्वयं-भगवान व्रजेन्द्रनन्दन श्रीकृष्ण आणि त्यांची स्वरूप-शक्ति श्रीराधिकेच्या आराधना आणि कृपेशिवात कोणी असा अनुपम ग्रन्थ प्रकट करणे असंभव आहे. अतः यमुनेच्या किनाऱ्यावर कोठेतरी जवळच व्यासांचा आश्रम कृष्णगंगा घाटाजवळ असावा, जेथे चक्रतीर्थ आणि अंबरीष महारांजांची टेकडी जवळच आहे.

अशी पण संभावना आहे की मत्स्यगंधेचे भरण-भोषण करणारे नावाड्यांचे सरदार दासराज पण विष्णुपुरीतच रहात असत आणि सत्यवती तिथेच आपल्या वडीलाच्या घरी रहात होती. म्हणून महर्षि दुर्वासा मुनींचा आश्रम, भगवान दत्तात्रेयांचा आश्रम, महर्षि पराशर आणि श्रीवेदव्यासांचा आश्रम जवळजवळच होते. अतः हे स्थान ऐतिहासिक, पौराणिक आणि कृष्णाची लीला-स्थळी - सर्व दृष्टिकोणातून खूपच महत्वपूर्ण आहे.


* * *

## ॐ विष्णुपाद अष्टोत्तरशत श्रीश्रीमद्भक्तिवेदान्त नारायण गोस्वामी महाराजांचा सक्षिप्त परिचय

ॐ विष्णुपाद अष्टोत्तरशत श्रीश्रीमद्भक्तिवेदान्त नारायण गोस्वामी महाराजांचा शुभ आविर्भाव सन् १९२१ ई. मध्ये बिहार स्थित बक्सर जिल्हाच्या समीप तिवारीपुर नामक ग्रामात मौनी अमावस्येच्या अर्ध रात्री झाला. यांचे आई आणि वडील दोघेही 'श्रीवैष्णव' संप्रदायाचे दीक्षित वैष्णव होते. बाल्यकाळापासूनच यांची धर्मात रुचि होती. संसारापासून अत्यंत तीव्र वैराग्य झाल्यामूळे यांनी सन १९४६ ई. मध्ये मूळ चैतन्यमठ आणि इतर सर्व मठांचे संस्थापकाचार्य नित्यलीलाप्रविष्ट ॐ विष्णुपाद श्रीश्रीमद्भक्तिसिद्धांत सरस्वती ठाकूरांचे अंतरंग प्रिय पार्षद नित्यलीलाप्रविष्ट ॐ विष्णुपाद अष्टोत्तरशत श्रीश्रीलभक्तिप्रज्ञान केशव गोस्वामी महाराजांकडून विधिवत् दीक्षा प्राप्त केली. आपल्या गुरुजींसोबत यांना भारतवर्षाच्या जवळपास सर्व तीर्थांची यात्रा करण्याचे सौभाग्य प्राप्त झाले. सर्व स्थानांवर गुरुजींची हरिकथा ऐकून यांनी त्यांच्या

विचारांना गंभीरतापूर्वक हृदयंगम केले. सन् १९५२ ई. मध्ये यांनी श्रीश्रीलभक्तिप्रज्ञान केशव गोस्वामीकडून संन्यास ग्रहण केला. काही काळ पश्चात् गुरुजींनी यांना हिंदी भाषेच्या प्रदेशात श्रीचैतन्य महाप्रभुच्या वाणीचा प्रचार करण्यासाठी श्रीकेशवजी गौडीय मठ, मथुरेत संचालक म्हणून नियुक्त केले. येथून त्यांनी गुरुजींच्या आज्ञा व कृपेने श्रीभागवत पत्रिकेचे संपादन आंरभ केले आणि जैवधर्म, भक्तिरसामृतसिन्धुबिन्दु, रागवर्त्मचंद्रिका, सत्क्रियासार दीपिका, भागवतामृतकणा, व्रजमण्डलपरिक्रमा, नवद्वीपपरिक्रमा आणि अन्यान्य बंगला भाषेत रचित अनेक श्रीगौडीय वैष्णवधर्म संबंधी साहित्यांचे हिंदी भाषेत अनुवाद कार्य करण्याचे प्रारंभ केले, ज्यांचा आज इंग्रजी, स्पॅनिश, डच, फ्रेंच, जर्मन, रशियन, इटालियन, पोर्तुगीज, चिनी इत्यादि जगातील अनेक भाषांमध्ये अनुवाद होत आहे. अनेक सुयोग्य ब्रम्हचारी भक्तांना संन्यास प्रदान करून प्रचार कार्यात रत केले आहे. आज सा॑ याभारतात आणि भारताच्या बाहेर अमेरिका, ब्राझिल, इग्लंड, फ्रांस, बेल्जीयम, हॉलंड, इटली, स्पेन, कॅनडा, रशिया, मेक्सिको, कोस्टारिका, ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया, मलेशिया, फिजी, न्यूझीलॅण्ड, जपान, चीन, तथा हवाई (होनोलूलू) इत्यादि विश्वाच्या छोट्या-मोठ्या देशांत स्वतः आणि आपल्या शिष्यांद्वारे शुद्ध-भक्तिचा प्रचार करीत आहेत. या प्रकारे ते वृद्धावस्थेतही श्री हरि-गुरु-वैष्णव मनोऽभीष्ट सेवेत उत्साहपूर्वक तत्पर आहेत.





**त्रिदण्डीस्वामी श्रीश्रीमद्भक्तिवेदान्त नारायण गोस्वामी महाराज**




**Yamuna Devi Deity at Durvasa Temple**
(Photo by: Anita Dasi)





**Durvasa Temple**

(Photo from GVP Archives)